
# कादोडी

नाताळ २५ डिसेंबर २०१९

आठवा वहरी  एकून १५ वॉं अंक

(खाजगी  वितरन)



९३व्या अ. भा. मराठी
साहित्य संमेलनाव अध्यक्ष,
फा. फ्रान्सिस दिब्रिटो
यांसा अबीनंदन..!

# कादोडी

**नाताळश्या हनाव विशेषांक**

**२५ डिसेंबर २०१९**

आठवा वहरी

एकून पंद्रावॉ अंक

खाजगी वितरन

## या अंकात .......


संपादकीय

फा. दिब्रिटो एक आठोन - जोसेफ तुस्कानो

फा. फ्रान्सिस दिब्रिटो: सर्वसमावेशक व्यक्तिमत्व - संदीप राऊत

आमसॉ तात्याफादर - आग्नेस कोरिया

रसिक मित्र - फादर फ्रान्सिस दिब्रिटो - सायमन रॉड्रिग्ज

एक आठोन - आगुस्तिन दिब्रीत

एक आठोन – बनाबाय

जीवनफुल – तेरेजा डिसोजा

माव आवडतॉ पक्षी : गावठी कोंबडॉ - सॅबी परेरा

"दिनार"सॉ आलॉ पूर! आन नावळीला.... - ईनास तुस्कानो

जबाबदारी - फ्रॅंक डॉ. मिरांडा

मामरशी दादी -- सिल्विया एरिक रॉड्रिग्ज

फा. फ्रान्सिस दिब्रिटो विशेष


**संपर्क / अभिप्राय :-** आमश्या हरी संपर्क कऱ्याकरतान नातॅ आपला या अंकाविषयीसा मत, संपादक मंडळाश्या कुनालाही भॅटॉन जरूर कळवा.

**या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत हायदॅस आहा नाय.**

**सूचना:-** 'कादोडी' या अंकात तुमाला लेख, कविता आहा कय द्यासा हायदॅ तॅ **kadodivasai@gmail.com** याओरती धाडा नातॅ संपादक मंडळाला भेटा.

जकलॅ जाहिरातदार, देनगीदार तहॅस बरा-वाईट मत देनाऱ्या जकल्या कुपारी लॉकांॲ आमॅ खूप आभार मानत्याव.
**नाताळसॉ हन सब्बान कुपाऱ्यांना खुब आनंदाव आन मजॅऑ जाओ अह्यो शुभेच्छा.**


**संपादक**

ख्रिस्तोफर रिबेलो (९८१९४३६०७८)

**सहसंपादक**

एडवर्ड डिसोजा सुनील बा. डिमेलो

**संपादक मंडळ**

सायमन रॉड्रिग्ज, तेरेजा डिसोजा, जेम्सन डिमेलो, डॅनियल मस्करणीस, रॉबर्ट फर्नांडिस, राजन डिमेलो, रॉबिन्सन डिमेलो, वॉल्टर तुस्कानो

**मुखपृष्ठ :-** पॉल डिमेलो, गास

**Email :-** kadodivasai@gmail.com

**Web :-** www.onevasai.com

**मुद्रक :- मॅन्युएल प्रिंट, वसई पूर्व – ९७६५८७४४९३**

**वितरक -** युवक वाचनालय (भुईगाव), विवियन डाबरे (जोहोडी), रॉयल डिमेलो (ओलोटी, गास), नितिन डाबरे, साहिल दोडती (निर्मळ), रूपेश रॉड्रिग्ज (दारसेंग), रोनाल्ड गोम्स (गोम्सआळी), संजय आल्मेडा (वंडा), सुनिता फर्नांडिस (मर्देस), रेन्सली निग्रेल (भागाळी), डायना दिब्रिटो (पोंडा), अनिल डाबरे (अक्करवाडी), मिल्टन रिबेलो (नानभाट), फ्रॅंक डॉ. मिरांडा (उमराळे), ॲलन व रॉबिन रॉड्रिग्ज (राजोडी), एलायस रॉड्रिग्ज (बोळींज), सचिन मेंडिस (जापके), ग्लोरिटा परेरा (घोसाळी), जॉन्सन दिब्रिटो (उंगनभाट-वाडी), कॉलिन मचाडो(मशाद), बेंजामिन केदारकर (केदार), साविन तुस्कानो (घोटकाल), रॉजर रॉड्रिग्ज (परसाव-पेडी), डॅनियल कोरिया (खोडाळे), अंद्रू सर (लालोडी-बावखाल), रॅकमन लोपीस (रुमाव-बानभाट), रूबन डिमोन्टी (मेढे), कोशाव मॅडम (नोनोडी), सिल्वॉन व निक्सन डिमेलो (वटार-थोंटेभाट), जिमी मोरो (जेलाडी), मायकल डिक्रुझ (सत्पाळा-घोटार), आलेक्स कोरिया (नांदान), ग्रेगरी लोपीस (पडई), वॉल्टर तुस्कानो (मेदोडी-तोरभाट-वडखांब), नितीन घोन्सालवीस (खिवनी), सिरील मिनेझीस (मेरभाट), मेल्विना लोपीस(शिरलयवाडी)

संपादकीय

# अबीनंदन फा. फ्रान्सिस दिब्रिटो...

जकल्यांना नाताळश्या हनायो खुब खुब सुबेछा.

आपल्या सामवेदी कुपारी समाजाव इतिहास ६००-७०० वहरे जुनॉ हाय. आपला मूळ उत्तराखंडपासून कच्छ तॅ वसय आहा फिरात आलॅ, आपुन भटकी जमात ओथे आहा हांगत्यात. आतॅ युस, युके, कॅनडा आन ऑस्ट्रेलिया-न्यूझीलंडला जानारे आपले पोरे आन दिवाळी, मे-नाताळश्या रजेत खाली हॉनारे आपले घरेश्या घरे त्योरनॅ आपुन भटके ता पक्का जालॅ आहा वाटातॅ, कय पन होवो, आपल्या कुपारी समाजानॅ जी गेल्या कय वहरामिनॅ प्रगती केले, ओडी एक समाज भगून बी कुनाई जाले हायदॅ आहा वाटे नाय... आपलॉ फा. फ्रान्सिस दिब्रिटो (जकल्याव लाडकॉ तात्या फादर) मराठी साहित्याआ जकल्यात भोटया पदोर पॉसलॉ, “कादोडी” २०१६श्या नाताळ अंकाआ ‘संपादकीय’ मिनॅ जा एक स्वप्न हांगीलता, जॅआत आपलॉ कुपारी समाज वॅगवॅगळया गुनानॅ कॉडॉ शिरमंत हाय त्याबद्दल लीविलता, त्यात “आपल्या वसयला मराठी साहित्य संमेलन हॉया पाय आन तॅत फा. फ्रान्सिस दिब्रिटोला अध्यक्षपद मिळया पाय” आहा पन लीविलता, पयला नाय पन दुहरा स्वप्न पुरा जाला आन फा. दिब्रिटो उस्मानाबादला होनाऱ्या ९३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाव अध्यक्ष जालॉ आन तॉ पन निवडनूक न ऑथा. आतॅ पयला स्वप्न पन जास्ती लांम नाय आहा वाटातॅ. आपल्या सगळयाव यॉ अभिमान हाय, भगूनूस आपुन ऑ अंक आपुन त्यानसॉ गौरवांक भगून काडलॅ. तात्या फादरश्या कुटुंबादरनॅ त्यासबरबर त्यांश्या संगतीत जॅयी काम कॅलॅ त्यान्श्यो आठोनी या अंकात दिल्यात. फादरना “कादोडी” अंक आन “कुपारी कट्टा” टिमसॉ सलाम आन संमेलनाकरता खुब सुबेछा.

आपलॉ कुपारी समाज वॅगवॅगळया गुनानॅ जाम शिरमंत हाय, त्यायी आपल्याला आतॅ पोचपावती मिळया लागलॅ. आपला लोक कॉर्पोरेट फील्ड मिने सीईओ (CEO) पदापर्यंत पॉसलॅ, आपले लेखक-कवी पेपरमिनॅ लिव्या लागल्यात, साहित्य क्षेत्राशे भॉठॅ भॉठॅ पुरस्कार आपल्या मंडळींना मिळया लागलॅ. म्यूजिक डायरेक्टर, गायक-गायिका, ॲक्टिंग, फिल्म डायरेक्टर, शॉर्ट फिल्म, वेब सिरिज, चित्रकारीमिनॅ मुंबयश्या आर्ट गॅलेरीमिनॅ प्रदर्शन इ जकला आपल्या समाजाआ नावोर जालॅ. खेळामिनॅ पन अस्तॅ अस्तॅ आपले पोरे पुडॅ या लागल्यात, क्रिकेटमिनॅ भारताआ टिममिनॅ लवकरूस आपल्या समाजामिनसॉ खेळाडू येनार ऑड्यापर्यंत आपले पोरे पुडॅ गेल्यात. डॉक्टर, आयटी इंजीनियर तॅ हातूस, आयआयटी (IIT), आयआयएम (IIM) पोत पन पोसल्यात, सीए पन खुब हॉया लागल्यात, उद्या एखादी भोठी ऑडिट फर्म कुना कुपाऱ्याआ नावोर जाली तॅ नवाल नाय. आतॅ पीएचडी पन खुब लोक हॉया लागलॅ, एखाद्या भोट्या कॉलेजसॉ प्रिन्सिपल आपलॉ कून नक्कीस हॉयॅदॅ. ऑडा झाकला मस्त मस्त असताना दोन गोष्टी विशेष हांग्या वाटात्यात, त्यो मंजॅ आपल्या समाजाऑ राजकारणातनॅ कुन आमदार हॉॲसॉ रॅलॅ आन बी मंजॅ अजूनपर्यत्त इंडियन एडमिनिस्ट्रेटिव सर्विस (आयएएस-IAS), इंडियन पोलिस सर्विस (आयपीएस-IPS), इंडियन रेवेन्यू सर्विस (आयआरएस-IRS), इंडियन फॉरेन सर्विस (आयएफएस-IFS) नाय. आपलॅ पोरे त्याबाबतीत पन मार्गॅ ऱ्याशे नात अही आशा हाय. लवकरूस कुना तरी दापूडॅ लाल दिव्याई गाडी ऊबी रेलेली दिखेदे आहा वाटातॅ.

मंडळी, एक गोष्ट आनखी हांग्याशी मंजॅ आपला लोक आपल्या कादोडी भाशेत बऱ्यापैकी लिव्या लागलॅ. फेसबुक-व्हॉटसअप वर ता खुब वाश्यापन मिळातॅ. आपली भाशा लिखित स्वरुपात वाडव्या करता कादोडी संपादक मंडळ आपल्या पाठीशी हाय आन मदतीला पन हाय. भगून लिवीत ऱ्या आन आमश्यापोत--लोकांपोत पॉसवा. आपल्या समाजायी अहीस प्रगती होत रेवो आन आपली संस्कृती टिकॉन रेवो ई सदिछा.

आपल्या जकल्यांना परत एकदा नाताळश्या हनायो खुब खुब सुबेछा.

# फा. दिब्रिटो एक आठोन -- जोसेफ तुस्कानो, बोरीवली

९३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाव अध्यक्ष भगून बिनविरोध निवड जालॅलॅ आपल्या आख्ख्या वसयशे स्फूर्तीस्थान, गौरव, कुपारी समाजाव मानबिंदू फा. फ्रान्सिस दिब्रिटो मिंजॅस आपलॉ तात्याफादर बद्दल मायो कय आठोनी.

१९७४श्या सप्टेंबरशी गोष्ट. तिगाळा फादर दिब्रिटो श्रीरामपूरशा सोशल सेंटर मिनॅ काम करतोते आन फा. आब्रियो (नंतरसॉ आपलॉ बिशप) संपादक अहलेल्या 'सुवार्ता' मासिकात विनय वसयकर या टोपन नावानॅ लिखान करॅशे. ॲका अंकात रुदय जड करनारी कानी लीविलती. पयल्या पॉरानंतर कुटुंब नियोजन कॅलॅल्या ॲका तरून जॉडप्याई कानी ओथी ती. तिगाळा मॅ आन माव दोसत रिचर्ड नुनीस (पाली/मेलबर्न) आमी फादरसॉ पत्तॉ शोदीलॉ. तिगाळा फादरनॅ एक पत्र धाडलोता.

तारीक- २३-०९-७४

*प्रिय ज्यो,*

*तुझं पत्र मिळालं. प्रथम ओळखच पटली नाही. तू ओळख दिली आहेस, तरी अजून चेहरा डोळ्यासमोर येत नाही. हरकत नाही, एक दिन मिलेंगे. पत्र अगदी सुंदर लिहिलं आहेस, अगदी लेखकासारखे, अभिनंदन, keep it up.*

*तुला लिखान करण्याची आवड आहे असं म्हणतोस. फार छान ! खूप खूप लिखाण कर. सध्या तू सेकंड ईअरला आहेस, अजून अभ्यासाचा खूप मोठा टप्पा पुरा करायचा आहे, तेव्हा तुझे प्रथम कर्तव्य अभ्यास आहे......'*

अडनॅस आमशा दोस्तीऑ परवास सुरू जालॉ. पयल्यापासूनुस फादरला आपल्या समाजाआ तरून पोरांबद्दल तळमळ आन प्रेम ऑथा. त्यादरी वखत कमी अहोनपन आपल्या पॉरांना पत्रे लिऑन त्यांना मार्गदर्शन आन प्रोत्साहन द्याशे. पन त्यास जोडीला कतॅ कतॅ कानपन पिळयाशे, गरज लागली तॅ मदत कऱ्या तयार, याव अनुभव मॅ सॉता घॅतलॅ.

२८ ऑक्टोबर १९७६ जिगाळा मॅ एम. एस्सी. करता कॉलेजला गॅलॉ तिगाळा फादरनॅ माला पत्र लिऑन माला धीर दिलॉ.

*'तुला एम. एस्सीला प्रवेश मिळाल्याची बातमी रिचीकडून कळली. अभिनंदन. या परीक्षेत तू फर्स्टक्लास मिळवलास तर तूला मी फर्स्टक्लास बक्षीस देईन. By The Way, तुझ्या खर्चाचं कसं काय चाललंय? पैशाकरीता काही अडू देऊ नकोस, तशी अडचन असेल तर कळवावे, निसंकोचपणे...'*

निखळ मैत्री नात्यानॅ यॅनारॅ त्याय पत्रे आमा तरुनांना खूप जीव लाव्याशे. आहास २३ ऑक्टोबर १९८३ला धाडलॅला पत्रस बगा...

*'सुवार्तेच्या, तुझ्याकडून खूप खूप अपेक्षा आहेत. तू सुवार्तेचा खास लेखक आहेस (आनी गौरवसुद्धा!) 'मी खाऊन पिऊन दालमेद (as they say in Gass). काम खूप आहे पन तुमच्यासारखी माणसं अवतीभवती आहेत हाच आनंद आहे. तुझ्या गुलाब फुलाला आमचा सलाम !'*

ऑगस्ट १९८० ला मा बाबाआ मरान जाला तिगाळा फादर जर्मनीला ओथे, तडनॅ त्याई माला पत्र धाडला – *'तीर्थरुप वडलांच्या निधनाची दु:खद बातमी कळली. हे दु:ख काय असते याची मला कल्पना आहे. महिन्याभरापूर्वी तू मला त्यांच्या आजाराविषयी माहिती दिली होती व त्यावेळी मी तुला लिहिलेलं पत्र आठवत असेलच, तेव्हा असे काही unthinkable घडेल असं वाटलं नव्हतं.*

*पन वस्तुस्थितीचा स्वीकार करायला हवा. खूप मोठी जबाबदारी तुझ्यावर येऊन पडलीय, तिचा प्रेमाने स्वीकार कर. लिखाण चालू आहे का ? रिची भेटला होता का ? मी उद्यापासून व्हिएन्नामार्गे रोमला निघत आहे. आपली भेट (पत्ररूपानॅ) रोमला.'*

फादरनॅ आमाला धाडलेले पत्रे ऑस माला आन रिचीला मिळालॅलॉ खजानॉ. जिगाळा कतॅ मा मन रंजी ऑथॅ तिगाळा मॅ जमा कॅलॅल्या फादरशा पत्राई पुंजी कार्डॉन वाशीत बॅहॅतॅ आन तरुनपनातसॉ आमशा मैत्रीआ आठोनीसॉ झरॉ खळखळॅ वाया लागातॅ. पत्रातशॅ फादरशॅ आपुलकीॲ विसार वासॉन मन शांत / ठंडा ऑथॅ.

आदी सुवार्तेत छापॉन आलेल्या 'परमाचार्य पोप' या लेखाआ २००२ ला पुस्तक प्रकाशित जाला जा मे फादरला अर्पन कॅला आन लीविला –

*मित्रवर्य रे. फा. फ्रान्सिस दिब्रिटो*

*सतत अस्वस्थ ठेवणाऱ्या*
*तुमच्या शाबासकीला... !*

लगोलाग फादरनॅ पत्र रूपानॅ उत्तर दिला -

*'प्रिय ज्यो, 'आपले पोप' हे पुस्तक मला समर्पित करून तू मला प्रेमाचा जबरदस्त धक्का दिला आहेस. आपली मैत्री खूप जुनी आहे, तेव्हा 'आठवर' होतो, म्हणून तुम्हाला (रिचर्ड व तुला) खूप खूप लिहिले. आता संसार वाढले आहेत. कधी कधी एकाच वेळेला दोन दोन संसार करावे लागतात.*
*तू बहूप्रसव झाला आहेस. किती लिहितोस, अभिमान वाटतो तुझा, आता महत्वाचं – महिन्यातून दोन दिवस घराबाहेर पडायचं- पुण्याला वगैरे. – वर्षातून १५ दिवस थंड हवेच्या ठिकानी रजेला जायचं हे प्रॉमिस देणारं पत्र लगेच पाठव. गुलाबला व मुलांना आशीर्वाद*
*आपला, फ्रान्सिस'*

फादरसा रुदय सानॅगुरूजीआ हाय. लान्या पोरोर बरॅ संस्कार जाले पात भगून त्याई सुवार्तेत पोरांआ आवडीया लिखान कऱ्या करतान मा हारक्या खुपशा लोकांना राजी केला. बालविज्ञान कथा, लाकडी बाहुला, परमाचार्य पोप, द लिटिल सायंटिस, गोन्सालो गार्सिया आहा लिखान मा दरनॅ करॉन घॅटला. इ मिंजॅ फादरशी पुडॅ ॲनाऱ्या काळानुसार समाज घडव्याशी दैवी नंदार.
फादर धार्मिक पुढारी अहॉन पन विज्ञानोर त्याआ प्रेम ऑथा. हिरवी वसय हिरवीस रेली पाय भगून तॅ आजपोत लढॉ देते आथ.

१ ऑक्टोबर १९८९ ला फादरशा पुढाकारानॅ "हरित वसई" ऑ पयलॉ मोर्चा निगालॉ. त्यानंतरशे आंदोलनॅ आपल्या जकल्या गाई हायुस. पन ऑ मोरशॉ खपल्योर फादर, दादा (मार्कुस डाबरे), सायमन मार्टिन अहे आमे जीवन दर्शन केंद्रात बॉलात बेहेलते तिगाळा थकले भागले फादर बोयले, *''मुलीला सासरी पाठवल्यागत कसं एकाकी नि सुन्न वाटतंय...'*
हरित वसई आ आंदोलन फादरला लेकी हारका ऑथा इस खरा.

## फा. फ्रान्सिस दिब्रिटो: सर्वसमावेशक व्यक्तिमत्व -- संदीप राऊत, वसई

फादरशी आन माई ओळख १९८२ला जाली. मा मित्रानॅ माला सुवार्ता ऑफिसमिनॅ निलता तिगाळा फादरशी भेट जाली. फादरनॅ माला विसारला मॅ का करतॅ! वाशाशी आवड हाय गा? मंग का वाशीता? मॅ जक्ला हांगीला. वाशाशी आवड होतीस. मॅ कॉलेज करॉन नोकरीला लागलॉतॉ बास आन फादरनॅ जूनला सुवार्ता संपादक भगून काम सुरू कॅलता. हिनवार नातॅ कतॅ हुट्टीआ दिहा मॅ सुवार्ता ऑफिसला जासॉ. काहा जानॅ पन फादरनॅ माला हळूहळू बारीकसारीक लिव्यासा काम द्या सुरवात केली. आलॅल्या लॅखाआ प्रूफ तपाशा हांगॅ लागले. जॅआ मित्रानॅ माला सुवार्ता ऑफिसला निलता तॅला एकदी फादरनॅ हांगीला, 'याला हॉडॉ नाका, साहित्याई आवड हाय.'

१९८३ला जिगाळा सुवार्ता मॅळावॉ घ्यासॉ ठरलॉ तिगाळा मायोपन जुरूकश्यो ओळखी ओथ्यो तॅतशास डॉक्टर पालव या मित्राआ ओळखीतनॅ मॅ गोव्याशे शिक्षनमंत्री डॉ. गोपाळराव मयेकर यांना फादरशा हांगन्योरनॅ मॅळाव्यात बॉल्याकरतान बोलविला. तॉ मॅळावॉ गिरीजशा सेंट झेवियर चर्च हॉल मिनॅ जालतॉ. त्या मॅळाव्यात डॉ. गोपाळराव मयेकर याई ज्ञानेश्वरीयोर व्याख्यान दिला. त्यास मॅळाव्यात संत साहित्याव अभ्यास अहलेले डॉक्टर यु. म. पठान याईपन संत साहित्योर व्याख्यान दिला. यो जकल्यो आठोनी मा समोर आथ. फादरमुळॅस तॅ इ जालता. चर्चमिनॅ ज्ञानेश्वरीयोर व्याख्यान इ घटना त्याकाळात शक्य नोती पन ख्रिस्ती धर्मपन कॉडॉ सहिष्णू हाय इ, या सुवार्ता मॅळाव्यातनॅ फादरनॅ दाव्डॉन दिला. या मॅळाव्याला तिगाळशा बिशपनॅ पन परवानगी दिलती. त्या मॅळाव्यापासून सुवार्ता मॅळावॉ मिंजे चांगले विसार दॅनारॉ मॅळावॉ भगून लॉकां मनात भरलॉ. फादरशा काळात राम शेवाळकर, डॉ. अभय बंग, शिवाजीराव भोसले, यशवंत पाठक, अनिल अवचट अहया कितीतरी बोठ्या लॉकाई भेट दॅऑन आपलॅ विसार मांडील्यात.

आज साहित्य संमेलनाव अध्यक्ष भगून फादरला जॉ मान मिळालॅ त्याय बीजे आन सुरवात या सुवार्ता मॅळाव्यापासून जाले हायदे आहा माला तरी वाटातॅ. कारन त्यास काळात फादरसा लेखनपन एकदम बहरात ओथा. ओआसिसच्या शोधात, पोप जॉन पॉल, दैनिक सकाळ अहया पॅपरातनॅ खूप लिखान कॅला. धर्मगुरूपद हाम्ब्ळॉन त्या पदोर कुहन्यास परकारसॉ अन्याय न करता फादर समाजाआ फायद्याकरता रस्त्योर उतरलॅ. आजशी वसय मिंनॅ जी कय हिरवळ दिखातॅ ती फादरमुळेस. हरीत वसई संरक्षन समितीआ माध्यमातॅ

वसईत ३० वहरापासून लढॉ दिलॉ. तॅना खुपशे धमकीए फोन पन आलॅ. मॅ एकदा विसारला पन, 'फादर तुमाला घाबरॉ नाय वाटॅ गा?' त्योर फादर बोयले, 'मॅ मरनाला घाबरे नाय, ख्रिस्तानॅ मा खांदयोर खुरूस दिलॅ मंग कदो आन कुनाला घाबरॉ.' फादरसा इ उत्तर आयकॉन माला बेताम हुरूप आलॉ. माला खऱ्या अर्थानॅ वाटातॅ 'फादर मासे धरनारॉ नाय तर माहनॅ धरनारॉ माहनू हाय.'

फादरशा आथा माहनॅ कमव्याशी खुबी हाय. एकदा गा त्याई एखादॉ माहनू हेरलो गा तॉ माहनू फादरशा आथनॅ हुटॅसॉ नाय. वसयमिनॅस नाय तर जगात फादरशे सगेसोयरे आथ. महाराष्ट्रात कडेपन कुहन्यापन बोठ्या माहनाला हांगीला गा तुमे वसयशे गा ते बॉल्नार, 'हा मिंजे आमशा फादर दिब्रिटोआ गावशे. इ जक्ला धन फादरनॅ आपल्या स्वभावानॅ करतूत्वानॅ मिळविलॅ. फादर मिंजॅ बहुगुनी व्यक्तिमत्व. वक्तृत्व, लिखान, समोरशा बरबर बोलेशी पद्धत, त्याआ तोंडोरसा तॅज तॅआ बोठापन दाव्डॉन देतॅ.
फादरशी बी एक आठोन माला हांगेशी हाय, माइ पोरी लानी ओथी तिगाळा मे तिला घेओन एकदा फादरला भेटया जीवन दर्शन केंद्रात गेलतो. फादर बोयले, 'संदीप मे आते तुमाला शार मयनॅ दिखनार नाय. मे साल्लो इटलीला. फादरसा बोल्ना आयकोन माइ पोरी रड्या लागली. फादरला पन एक आवट आलो. फादरनॅ पुडे का केला ते इटलीनॅ आल्योर सकाळ पेपरात 'शर्वरीचे अश्रु' अहो लेख लीविलो.

फादरशा आयुष्यात खुपश्यो बऱ्योवाईट घटना घडल्यो. त्यो गोष्टी त्याई त्या "नाही मी एकला" या पुस्तकात लीविल्यात. इ जक्ला वाशिल्योर आपल्याला हुमजाते ओ फादर कोडो बोठो माहनू हाय तो. फादरला खूपदा प्रॅक्टिकल वाग्या लागाते. धर्मगुरू भगून प्रेमाय आन समाजसेवक भगून शिस्तीत ऱ्या लागाते. फादर मनात्ने बेताम हळवो हाय. इ मा हारक्या खुपशा लोका गायी हाय. मे खूपदा फादरशा डोळ्यात आहु बगील्यात. फादरनॅ अमुक एक गोष्ट आयकिले आन बीया काननॅ होडोन दिले आहा जाला नाय. त्या गोष्टीयोर ते चिंतन करत्यात. फादरशे प्रवशनॅ आन भाश्ने आयकीले गा ता आपल्या धॅनात येते. एखाद्या विशियोर बोल्याशा आदी फादर त्योर ओबडा चिंतन करते अभ्यास करते इ मे सोता बगीले. फादरसो अजून एक गुन हांग्यासो मिंजे त्यांना एखाद्या गोष्टीओ संदर्भ माइत नायदे ते तो विसऱ्या लाजात नाय. त्यांना दुहऱ्यांना विसार्न्यात कमीपना वाटे नाय.

आपलो माहनू कोडो बोठो हाय इ त्या घरशा जकल्या लोकां गायी हायदेस आहा नाय. फादरला अ. भा. मराठी साहित्य संमेलना अध्यक्ष मिळनॅ इ वसयकरांना अभिमाना हायुस पन आख्या ख्रिस्ती धर्माकरता अभिमानाइ बाब हाय. पोपसाहेबाइ 'सर्वधर्म समभाव' संकल्पना राबविन्यात आन त्याई जतान करन्यात फा. दिब्रिटो नक्कीस पुडे आथ. फादरबद्दल लिव्यासा तोडा कमीस. एक दोन-लेखात मावनारो ओ माहनू नाय. फादरला पुडशा वाटसालीकरता सुभेच्छा.

## आमसॉ तात्याफादर -- आग्नेस कोरिया, नंदाखाल

माला तॉ दी अजून आठवातॅ जिगाळा "महानगर" पॅपराआ पयल्या पानोर बातमी आलती, "फादर दिब्रिटोंना खूनाची धमकी!" आमशा कुटुंबाकरता ती जाम घाबरवनारी बातमी होती; मा लगीन जवळ आल्ता. लग्नाई तयारी सालू असताना अचानक अही बातमी आयकॉन घरशे जकले घाबरले. हांसॉ फादर घारा आलॉ, तिगाळा मॅ विसारला, "फादर, तुमाला माऱ्याशी धमकी कही का दिली जातॅ? तुमाला घाबरॉ नाय वाटॅ आ? त्यावर फादर बोयलॉ, "येशू ख्रिस्त ३३ वहराव हॉतॉ, मॅ ४६ वहराव हाय. या जगासा मा काम खपलॅ हायदॅ तॅ मॅ निंगॉन जायनॅ. मा काम माफियांपासून भूमिपुत्रायो जमिनी वाशव्यासा हाय. त्याकरता मॅ कुना शक्तीला गा व्यक्तीला घाबरॅ नाय. 'गुंड माझा मेंढपाळ, माझा करी सांभाळ' आहा मॅ कतॅ हॉवॉन द्यासॉ नाय." जॅनॅ जळतॉ निखारॉ हातात घॅऑन लोकांकरता आपल्या शरीराव कन आन आयुष्या क्षन दिलॅ अह्या काकाव माला रास्त अभिमान हाय!

साहित्य संमेलनाआ अध्यक्षपदी जालेली त्यायी निवड ई तमाम वसईकरांकरता आन आमश्या कुटुंबाकरता मानाव तुरॉ हाय. आमी लाने होते तिगाळा फादर आमाला उहा मळ्यात न्यासॉ आन ऊ साप करॉन द्यासॉ. वसईकरांव लाडकॉ फादर मंजॅ तरूनांकरता उर्जेआ स्त्रोत, ज्येष्ठ लोकांकरता आधार, पीडित लोकांना धीर देनारॉ फादर खुब जनाकरता प्रेरणास्रोत हाय. वसईशा एक लाख लॉकांआ मोर्चाविळसा फादरसा ता भाशान आन मेधा पाटकरशॅ विसार माला आज पन आठवात्यात. "शासनवाले सुनलो आज; हमारे वसईमे हमारा राज." तिगाळासॉ त्याव तॉ उत्साह, तडफदार नेतृत्व आन श्री. उल्हास जोशी याई लाभलेली साथ फादरला पूडशा कार्याकरता लागू पडली. त्यानंतर फादरनॅ कतॅ मार्ग वळॉन बगीला नाय. बाबा आमटे भाषेत बॉल्यासा मंजॅ, "भान ठवॉन योजना आख्याशो आन बेभान हॉवॉन ती राबव्याशी." अह्या प्रकारॅ तन-मन-धन लावॉन कार्य करनारॉ फादर आमसॉ आदर्श हाय. १९९० साला एका परीक्षेकरता मॅ कोल्हापूरला गेलती. तडॅ वाचनालयात वाचन कऱ्या एका डॉकरॉ बाबा आल्तॉ. आमशी ओळख जाली, तॉ बोयलॉ, "तुम्ही दिब्रिटो

का? तुम्ही फादर दिब्रिटोंना ओळखता का?" मॅ बॉठ्या आनंदान फादरशी पुतनी हाय आहा हांगतास तॉ बाबा जाग्योरनॅ उठलॉ आन बोयलॉ,"मला त्या देवमाणसाचा नंबर द्या. भेटलो नाही तरी एकदा फक्त फोनवर बोलेन आणि मग मी मरण पावलो तरी चालेल." एका हिंदू माहनाये तॅ शब्द आजपन मा कानात घुमात्यात.

फादर जॉडा कठोर बॉलातॅ तॉडॉस तॉ मनातनॅ मऊ हाय. दुहऱ्या दुःख बगॉन फादरला मॅ रडताना बगीलॅ. आजपन ५० वहराअगोदर निगॉन गॅलॅल्या बायकरता तॉ भावविवश हॉतॅ. कुना घारा दुःखाव प्रसंग घडलॉ गा जकले कामे बाजूला ठॉवॉन फादर त्या कुटुंबा सांत्वन कऱ्या धावॉन जातॅ. मॅरॅदारॅ काळोख अहलॉ तरी अंतरीऑ दिवॉ कायम पॅटवॉन ठवनारॉ. फादर आमसॉ दीपस्तंभ हाय.

एकदा सत्पाळा गावात एक तरुन पॉर मॅल्तॉ. आमी त्या घारा सांत्वन कऱ्या गेल्ते. तिगाळा ते बोयले, "फादर दिब्रिटो आले, छान प्रार्थना केली आणि आमचे सांत्वन करून गेले." तिगाळा मॅ पन ठरविला की फादर ऑडॉ बिझी आहातॅ तरीपन वेळ देतॅ, मग मालापन थॉडा कार्य करता येदॅ गा? या प्रसंगानॅ फादर आमशे प्रेरनास्थान जाले. फादरसा कार्य आन विसार, धर्म, जात-पात, भाषेया पलीकडे हाय. ते जहे साहित्यिक आथ तहेस ते गरिबाआ कैवारी आथ, ख्रिस्ताये सेवक आथ तहेस ते जकल्या धर्माय मित्र आथ, सत्यायॅ उपासक तर सुवार्ताॲ प्रेरक आथ, सुंदर वाचेये जनक आथ तर हरित वसई रक्षक आथ. फादरनॅ जीवनात कतॅ तडजोड केली नाय. ते कायम हांग्याशे,"आपले कार्य सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ असले पाहिजे." कॉडाही काम अहला तरी वहराला एकदा आमी जकले आमशा बाबा नावानॅ एकत्र येत्याव. वॅगवॅगळया नात्याशे जवळपास २०० नातेवाईक २६ डिसेंबरला फादरशा नेतृत्वाखाला भॅटात्यात तिगाळा ते आमाला हांगात्यात, "तुम्ही भेटत रहा, आपले नाते टिकवून ठेवा.

त्यामुळॅ आज बर्यास वहरान आमी "लोऱ्या दिब्रिटो" नावाओ ट्रस्ट सालू कॅलॅ ती फक्त फादरशा सौजन्यानॅ! आमशा जकल्यावर त्या खूप प्रेम हाय. आमशा ज्या पावन्या घारा लग्नाला दारू होती तडॅ त्यानॅ पाय नाय दिलॉ. "जडॅ दारू तडॅ मॅ पाय नाय द्यासॉ, मग कुनाला राग आलॉ तरी सल्दॅ." आहा फादरसा मत. मॅ मा पॉराआ लग्ना दारू ठोयली नाय त्याबद्दल त्यानॅ मा खूब कौतुक कॅला. ऑडास नाय तॅ लग्नात दोन दी सहभागीपन जालॉ. आमसॉ लाडकॉ तात्याफादर आमाला खूप प्रिय हाय. आमाला त्याव अभिमान हाय. समाजात आन समाजाबार त्यायी पुतनी भगून त्यानॅ माला ओळख दिले.

## रसिक मित्र - फादर फ्रान्सिस दिब्रिटो -- **सायमन रॉड्रिग्ज, आगाशी**

९३ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना अध्यक्षपदी फादरशी बिनविरोध निवड जाल्योर त्यांशाबद्दल आपल्या जकल्यांना माइत अहलेली बरीस मायती परत एकदा आपल्याला वाश्यादो आन आयकॅदो मिळाली. कदाचित बहुआयामी आन वलयांकित व्यक्तिमत्व अहल्यानॅ मॅ जरी फादरांशे खूब शर्माव आन व्याख्याने आयकिलेले अहले, सुवार्तामीनर्शॅ आन पॅपरातर्शॅ त्यांये लेख वाशिलेले अहलॅ आन आठ वहरे पुण्यात काडलॅनॅ मराठी साहित्य क्षेत्रात फादर का चीज हाय इ गायी अहल्यानॅ मॅ व्यक्तिगत-रित्या त्यांहुन लांबूस रॅना पसांद कॅलता. पन यंदा त्यांसा "नाही मी एकला" या आत्मचरित्रासॉ प्रकाशन सॉहळॉ बगील्योर लगेस ता आत्मचरित्र अक्षरशः एका बैठकीत वासॉन खपविला आन मंग सोशल मीडिया वर तॅआ सॉहळयाबद्दल आन आत्मचरित्राबद्दल मॅ एक पोस्ट लीवीली तॅइ सुरवात अहि ओथी..

*"शनिवारी NCPA नरिमन पॉईंट इथे सिम्फनी ऑर्केस्ट्रा पाहण्याचा योग आला. झेन दलाल ह्या इजरायली कंडक्टर नी जवळपास १०० वादक कलाकारांना घेऊन पाश्चात्य क्लासिकल संगीताची एक अविसमरणीय मैफिल जुळवली. त्यात जवळपास ३० मिनटं उस्ताद झाकीर हुसेन यांच्याशी त्या वादकांबरोबर झालेली तबला आणि संगीताची जुगलबंदी म्हणजे स्वर्गीय आनंद. जवळपास दोन तास स्वर्गीय आनंद घेऊन परतताना असं वाटत होतं, कि हा आनंद असाच मनाच्या कुपीत साठवून ठेवावा.. आणखीन त्यात कुठलीच सरभेसळ नको. पुढे काही दिवस तरी असं काही पहायला किंवा वाचायला नको कि जेणेकरून मनात भरलेल्या ह्या मैफिलीला जरासुध्दा धक्का बसेल."*

माइ ती पोस्ट फादरांपोत पोसली आन त्यानॅ माबरबर बॉल्याशी इच्छा केली. मा दरी निरोप आल्योर मॅ लगेस त्यांला फोन कॅलॉ. "फादर मॅ सायमन रॉड्रिग्ज, तुमश्या आत्मचरित्राबद्दल...." "अरे सायमन, ता आत्मचरित्र जाउंदे रॅ, पयला तू ता "सिंफनी" कडे बगीला ता हांग". पयल्यास वाक्यात फादरानॅ माला खिशात घायला. कोडे वहरे ॲकमॅकांना ऑळखात अहल्याहारके बऱ्यो तीस-पस्तिस मिनटे आमी गप्पा मारल्यो. आन विषय का? तॅ संगीत, कला, नाटक, सिम्फनी, ऑपेरा. "सायमन ॲखादो सिम्फनी किंवा

चांगलॉ नाटक वैगेरे हायदॅ तॅ माला हांग." मॅ फादरांला प्रॉमिस कॅला गा नक्कीस आपुन अहे प्रोग्रॅम बगॉ. आन तॉ योग लवकरुस आलॉ. लुई बॅंक आन झाकीर हुसेन यांशी बिया कायिक इंटरनॅशनल कलाकारांबरबर 'जॅझ म्युसिक' शी एक मेहफिल NCPA मीनॅ आमाला एकत्र बग्या मिळाली आन अगदी परवा झेन दलालशी एक सिम्फनी आमी एकत्र बगीली. फादरांला महफिल बगीताना आपुन बगना खूप मस्त अनुभव ऑथॉ.. ॲखाद्या निरागस पॉराघथी त्यांसॉ शॅहरॉ खुलल्लॅलॉ अह्यासॉ.

"सायमन, संगीत इपन एक आध्यात्म हाय. झाकीर आन लुई यांशी जुगलबंदी बगीली ना? ॲकमॅकांना कॉडॉ मान देतोते. ॲकानॅ सुंदर जागा घेटली तॅ समोरसॉ तॅला दाद कॉहॉ देतोतॉ बगीला गा? मॅ तूपेक्षा भारी कलाकार हाय, मॅ तूपेक्षा भारी वाजवितॅ मनून तॅला खाला पाड्यासा आहा कय तुला दिखला गा? आपुन यातनॅ का घ्यासा? रिफ्लेक्शन का घ्यासा? लगीन जालेल्या जोडप्यायी ऑहॉस ॲकमॅकांना स्पेस दिली आन दाद दिली, मॅ भोटॉ तू लानी, आहा कय नाय ईस भावना जर ॲकमॅकायी कॅरॉन दिली तॅ या जॉडप्या जीवन अहींस सुंदर महफिल नाय गा होनार?" मॅ खूब भारी भारी महफिल्यो बगील्यात पन त्योर बगन्यायी नवी दृष्टी माला फादरांनॅ दिली. "फादर, यी चर्च, धर्म वैगेरे मीनॅ मॅ जास्ती नहातॅ, आपला एक आयत्वारसा मिस आयकीला गा जाला,मॅ धड आस्तिक पन नाय आन धड नास्तिक पन नाय". "सायमन आतॅ आपुन जी सिम्फनी बगीली, आपुन एकदम तल्लीन जाले, बी जक्ला कय बाहले, इस खरा आध्यात्म,  आपुन जा कय काम करत्याव तॅत पूर्णपनॅ झॉखॉन दॅना आन तॅत आनंद मिळना इस आध्यात्म"
आध्यात्म्या ऑड्या सॉप्प्या भाशेत फोड करॉन आपल्या रॉजशा जगन्याहरी सांगड कही घाल्याशी इ माला फादरांदरनॅ हिक्या मिळाला. "सायमन, आपुन खूप लेट भेटले रॅ? तू माला आदी भॅटलॉ पाओतॉ रॅ". "फादर... कुहन्यास गोष्टीला उहुर नहातॅ... आपल्याला अजून खूब मैफिली बग्याशो आथ... आन माला तॅआ महफिलीमिन्नॅ खूब नवॅ अर्थ तुमश्या दरनॅ जानॉन घ्याशॅ आथ..."

***मंडळी, आमसॉ सहकारी सुनिलनॅ फा. दिब्रिटोसॉ बॉठो बाहा आन फादरश्या बोठ्या बाहाई पोरी यांश्याबरबर वार्ता केल्यो त्यात*** **फादरसॉ बॉठो बाहा आगुस्तिन दिब्रीत**नॅ फादरश्या लानपनाई एक आठोन हांगिली... फादर तिगाळा शाळीत ऑथॉ. फादरश्या घारा बैल ऑथॅ आन त्यालापान घरश्या ढोरा बग्या लाग्यासा. एकदी तॉ बैलांना पानी दावड्या न्या लागलॉतॉ, फादरश्या आथा पाग, पुडॅ तॉ आन मांगे बैल अहे सल्लोते. त्यात जॉ एक बैल ऑथॉ तॉ आयुष्यात कुना आंगोर गॅल नॉतॉ पान त्याला का जाला कुना गाई, तॉ जॉ फादरश्या आंगोर धावलॉ, फादरनॅ आथशी पाग टाकॉन जी धाव टेकीली ती उबी ऱ्या घारा. त्या दिहा फादरनॅ जी पाग होडली ती काईमशीस. **फादरश्या बोठ्या बाहाई पोरी, मेरी मंजे बनाबाय**. बनाबाय जरी नात्यान फादरशी पुतनी अहली तरी दोगात फक्त ९ मयन्याव फरक, फादर बायपेक्षा ९ मयने बॉठॉ. फादर आन ती एका वर्गाशे, हस्साल शाळीत जा-याशे. हाकोटे उठॉन देवळा जाऑन आले गा मंग घरश्या जनावरांना पानी दावड्या लाग्यासॉ त्यांश्या पुडॅ ऑलात नायतॅ पेंडॉ टाकील्या शिवाय शाळीत जाता यासा नाय. बनाबाय आन फादर मिनश्या हुट्टीत धावात धावात घारा याशे आन येता खोटी त्यांश्या पुडॅ धानायी ठाळी ठोयली जाशी आहा तुमाला वाटातॅ हायदॅ तॅ तुमॅ सापसुप चुकल्या. घारा येताखोटी पैली एक-एक भय पानावल्याबिगार धानाव हितकनपान बग्या मिळात नॉतॉ. हांशे घारा आले गा मंग मात्री बनाबायशी दादय दोगांना हस्साल खावड्याशी. फादरसॉ बाबा मंजॅ बनाबायसॉ बॉठॉबाबा याव या दोन्नी पोरोर जाम जीव. बाबा या दोगांना मांडीवर बेव्हडॉन फादरला हांग्यासॉ, 'तात्या, ई आपली बना.' आन बनाबायला हांग्यासॉ, 'बना, ऑ आपलॉ तात्यो.' बाबानॅ ठोयलेल्या या नावानूस आज आख्खॉ समाज फादरला आन बायला ऑळखातॅ.

# जीवन फुल

फुले हिकवित्यात
गुलाब हांगातॅ
येता जाता रड्यासा नाय
काट्यामिनॅ पान आह्यासा अहातॅ
रातरानी हांगातॅ
काळोखाला घाबऱ्यासा नाय
काळोखातपन उफळ्यासा अहातॅ
सदाफुली हांगातॅ
फुगॉ करॉन ऱ्यासा नाय
हावॉन हावॉन हायासास अहातॅ
गहरोळ्यो हांगात्यात
रंगोरनॅ नाराज नाय होयासा
गुना वासोरनॅ जिक्यासा आहातॅ
मॉगरॉ  हांगातॅ
स्वताई बढाई माऱ्याशी नाय
चांगल्या गुनाव वास मैलोरनॅपन येतॅ
कंबाळ हांगातॅ संकट आला भगुन
शिकलात बुड्यासा नाय
संकटाला बुडवोन फुल्यासा आहातॅ

■ **तॅरेजा  डिसोजा, गास**

# माव आवडतॉ पक्षी : गावठी कॉबडॉ -- सॅबी परेरा, नानभाट

जगात खूप पक्षी हात. त्यामिनशॅ खूप कमी पक्षी मॅ बगिल्यात पण मॅ बगिलेल्या पक्ष्यामिनॅ माव जकल्यात आवडतॉ पक्षी हाय कॉबडॉ. नुसतॉ कॉबडॉ नाय तर गावठी कॉबडॉ! गावठी कॉबड्याव रंग, त्याव तांबडॉ भडाक तुरॉ, त्याव सल्यासॉ रूबाब इ जकला माला जाम आवडातॅ. अन जिव्यादो गावठी कॉबडॉ केलॉ तर बग्यादोस नाका. आमसॉ भोटॉ बाबा हांग्यासॉ ज्या कुपारी माहना, वाला-गोळ्या भाजीओरसा, ओल्या बुंबला रसोरसा अन गावठी कॉबड्या मटनोरसा मन गॅलॅ, त्याइ आपल्याला मरान याशी वाट न बगिता ताबडतोब खाशीत जावॉन निजा. माला आहा वाटातॅ की, गावठी कॉबड्या मटन वादाट आहातॅ आहा हांगणा-या माहना, 'कुपारी डोमिसाईल सर्पतिकिट' डुब्लीकेट अहला पाय. गावठी कॉबडॉ त्या ऐन जवानीत, आरव्या लाग्याशा अगोदर कापॉन खासॉ आहातॅ इ न कळणारे माहनॅ कुपारी अहूस शकात नाय.

आमशा शाळीआ बाजूला एक कॉलेज हाय. तडनॅ जानारे-येनारे बरॅस तरून पोरे एकमेकाला कोपर मारॉन, "कबूतर बघ, कबूतर बघ" आहा हांगात्यात पन माला तडॅ कत्येस एकपन कबूतर दिखला नाय. अन या लोकांना रस्त्या बाजूला फिरनारे कॉबडॅ न दिखता कबूतरे कडॅ दिखात्यात ता पन कळला नाय. असो. कोंबडी मांडीत्यात तिगाळा मांडीलेल्या तात्यातनॅ जास्तीत जास्ती कोंबड्यॉ निंगाल्यॉ पात आहा तिआ मालकिनीला वाटातॅ. पन देवानॅ आयडिया अही केले की, पिलोटा तीनचार महिन्या होयापोत ता कोंबडी हाय गा कॉबडॉ इ कळॅस नाय. तात्यामिनॅ असताना जर तात्याइ सोनोग्राफी करॉन कोंबडी हाय गा कॉबडॉ इ कळलॉसा, तॅ ऑड्यादो कॉबड्याइ जात नाय-नठ्ठान जालोशी अन मेढ्यासॉ रॉबिन, घोटकालसॉ सेविन, पहरासॉ प्रशांत, अटाळीसॉ वॉल्टर, मराडीसॉ नोएल या हारक्या कॉबडॉप्रेमी लोकांना 'सेव कॉबडा चाईल्ड" अह्यॉ घोषणा देत मेणबत्ती मोर्चा काढ्या लागलोसॉ.

कॉबडॉ स्वभावाने जाम प्रेमळ आहातॅ. फरगोजीशा सगळ्या कोंबडीवर तो हारकास प्रेम करतॅ. कॉबडॉ शक्यतो कुनाव व्देष करी नाय पन आपल्या मालकिनीला जर अठवरी पोरी हायदॅ तर तिओरती कॉबडॉ जरा वाकड्या नजरेन बगितॅ. मॅ जुरूक चौकशी केली तॅ एका कॉबड्याने नाव न छाप्याशा अटीवर हांगिला की, इआ हयरा जाला गा सगळ्यात पयलॉ माव गेम होयदॅ भुगून माला आमशा मालकिनी अठवरी पोरी आवडॅ नाय. माहना पुढशा पिढीला ताते, कोंबड्यो अन कॉबडॅ मिळाले पात भुगून कॉबडॅ जलमभर खपात्यात. सरतेशेवटी आपल्या जीवा बलिदान सुध्दा करत्यात. खरा मिनजॅ त्यांना रक्तसाक्षी अहॉ मान द्या पावॉतॉ. अडॅ देवळात कशिन फिरविणारॅ सोताला समाजसेवक हांगात्यात. अन कॉबड्याला कुन समाजसेवक पन हांगे नाय या माला जाम वाईट वाटातॅ.

कॉबड्याव आनखी एक माला आवडणारॉ गुन मिनजॅ स्वाभिमान. कॉबडॉ नखरॅ करणा-या कोंबडीला जास्ती मस्कॉ मारी नाय. आवडलेल्या कोंबडीआ मेरॅ गेल्योर एक तंगडा टुकॉन, एका मेरसा पाख फडफडवॉन तॉ दोनेक वेळा आपला प्रेम व्यक्त करतॅ. पन कोंबडीनॅ जर अॅटीट्यूड दावडलॉ तॅ तिला फाट्योर मारॉन तो पुढे जातॅ, मजनूगिरी करीत तिआस मांगे लागॉन रॅ नाय. मॅ रोज हाकोटे लेट ऊठातॅ म्हणून लोकांना वाटातॅ की मॅ आहळी हाय. पन कॉबड्या आयुष्योरनॅ मॅ एक धडॉ घेटलॅ की हाकोटे कत्येस लवकर ऊठ्यासा नाय, कारन जो लवकर ऊठातॅ तो लवकर मरातॅ! कॉबडॉ आपल्या कामा बाबतीत खूप सिन्सियर आहातॅ. हाकोटे आरवॉन लोकांना ऊठव्यासा आपला काम हाय त्या कामात तो कत्येस सालढकल करी नाय. लोक हांगात्यात की, कॉबडॉ ढाकॉन ठविलॉ तरी सूर्य ऊगव्यासॉ रॅ नाय पन खरी गोष्ट अही हाय की पाहाळयात सूर्य ढगामागे ढाकलॉ जातॅ तरी कॉबडॉ आरव्यासॉ रॅ नाय!

कॉबड्याव आणखी एक गुण मिनजॅ, कॉबडॅ व्यक्ती-स्वातंत्र्याय ऊपासक आहात्यात. ते तुमशा निज्याशा स्वातंत्र्योर घालॉ घालीत नाय. अलार्मशा घती, तुमे ऊठॉन बंद करॅ तवपोत वाजात रॅत नाय. कॉबडॉ त्या त्या आरव्यासा काम करतॅ. तुमे उठॅ ते उठा नाय ते गेले ऊडात ! कॉबडॉ ऑ जबाबदार पक्षी हाय. ब-यासदा गावात शे-दोनशे कॉबड्यॉ आहात्यात अन् फक्त दोन-शार कॉबडे आहात्यात पण त्या शेकडो कॉबड्या संसाराइ जबाबदारी तॅ दोन-शार कॉबडे कुहनीस तक्रार न करता घेत्यात अन पार पाडत्यात. परत याबद्दल कडॅ मिरवाना नाय गा फुशारकी नाय.

आमे शाळीत जाताना आमाला रस्त्यात एक लालबुंद माहनू सायकलवर जाताना दिखातॅ. लोक हांगात्यात, "या माहनानॅ कॉबड्याघती आख्खॉ गाव गोधा घायलॅ." माला याव अर्थ कय कळालॉ नाय. मॅ आमशा मास्तरला विसारला. तॅ तॉ हांगातॅ, तू कय कळॉनपन घेव नाका अन् त्या घती ऑहॉ पन नाका. चाप्टर क्लोज्ड! कॉबडॉ ऑ ख-या अर्थानॅ कर्मयोगी आहातॅ, कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेशु कदाचन इ भगवत गीते मिनसा वचन कॉबडॅ अक्षरश: जगात्यात. गावशा कुहन्याही कॉबडीआ कुहन्याही तात्याइ,

पिलोट्याइ डीएनए टेस्ट केली तॅ सगळॅ सातबारॅ कॉंबड्यानावोर निंगेद्यात. पन आजपर्यंत कुहन्या कॉंबड्यानॅ कॉंबडीआ तात्यावर किंवा पिलोट्यावर स्वतःव हक्क हांगिलॅ गा? नाय! त्या म्हणना एकूस.. आपुन आपला काम करीत ऱ्यासा.

शाळीत असताना मास्तर आमाला खूप वखत कॉंबडॉ बनव्यासॉ. वर्गाबायार कॉंबडॉ बनलेले असताना आमाला वाट्यासा की आर्तॅ कॉंबडॉ होयाशी शिक्षा मिळालॅ, भॉटे जाल्योर कॉंबडॉ होयासा सुखपन मिळदॅ. पन कय गोष्टी नियतीला मंजूर नाहात्यात इस खरा! घरात बाळगिल्या जाणा-या सगळ्या प्राण्याला आपुन नावे ठवित्याव पन कॉंबड्याला कुन नाव ठवी नाय. नाव, आडनाव कईस नहल्याने कॉंबड्याला जातधर्म पन नाहातॅ. तुमे तॉ रांदीलॉ म्हणून कुपारी होये नाय, देवाला बळी दिलॉ भुगून तॉ हिंदू होये नाय अन त्याइ बिर्यानी केली तॅत्यान तॉ मुसलमान ठरॅ नाय. निजलेल्याला ऊठव्यासा अन सवताव जीव कुर्बान करॉन भुकेलेल्याला जिव्यादो द्यासा ऑ सगळ्यात ऊदात्त कॉंबडतावादी धर्म कॉंबड्यानॅ स्विकारलॅ.

कॉंबडॅ कुपारी लोकाघती आहात्यात, साधेभोळे. त्यांना राजकारण कय कळॅ नाय. आपापसात बारीकसारीक कुरबुरी अहल्यॉ तरी गुण्यागोविंदाने रॅत्यात. पन बारशा लोकांना इ सुख देखवे नाय. ईलेक्शन आला गा, कुन कडसॉ आप्पा येतॅ, कडसॉ दादा येतॅ, कडसॉ भाऊ येतॅ अन आपलॅ कॉंबडॅ झुंजवितॅ. आपलॅस कॉंबडॅ आपल्यास कॉंबड्या रगात काडत्यात त्या जाम दुख होतॅ. आमॅ लाने असताना कॉंबडीला अन् कॉंबड्याला कॉक बोल्याशे. इंग्लिश मिनॅपन कॉंबड्याला कॉक बोलात्यात. तॉहॉ इंग्लिश मिनॅ कॉकला बी पन एक अर्थ हाय. पन आहा डबलमिनिंग बोल्यादो माला आवडॅ नाय. कय वहरा अगोदर आपल्या अडॅपन "माझा कॉंबडा, तांबडा, कोणी मारीयला" अहॉ एक डबलमिनिंग गानॉ सौदीआला नासताना बोल्याशे. आतॅ सौदीआला पयल्याहारकी मजा रेली नाय. ताहा बगिला तॅ मजा कॅलास रेली नाय. बॉयलर कॉंबडीला सव नाय, बक-या मटन डॉक्टर खावॉन देत नाय, फ्रीजमिनसा मावरा खावॅ नाय, घरोघर टॉयलेट जाल्यामुळॅ भाटशा भाजीपाल्याव पन सव गेले. हांग्याशी गोष्ट मिनजॅ एकूस सव अजून टिकॉन हाय. गावठी कॉंबड्याव रस अन त्या बरबर कडाक पाव! इ जॅ होडला तॅ माला या जीवनात कईस रस रॅलॉ नाय! कोकोक कॉ!!

## "दिनार"सॉ आलॉ पूर! आन नावळीला जालॉ ऊहूर! - ईनास तुस्कानो, गास

"शाब्या" पडलॉ "कूवेत" रीटर्न. कूवेतवरनॅ यॅताना बक्काट "दिनार" घॅऑन आल्तॉ. लगीन लाऑन परत त्याला बायकू हॅगाट कूवेतलास जासा ऑथा. बय-बाबाई एक खांबाई माडी, मींजॅ एकलॉस पुत. गॅल्या रजॅत आल्तॉ तीगाळा हॉन्यानान्यापासून तॅ मांडव कॅटरींगसॉ जक्लॉ बंदोबस्त चोख करॉन गॅल्तॉ. बाज्यावाळयाऑ तॅ तॅनॅ, होयरा जक्याशा पूडनॅस वहरीबर आदी बयानॉ दॅऑन ठोईल्तॉ. बाकी रॅलॉ प्रश्न बारकी-सूरकी तयारी करॅसॉ, तॅ त्याआ महाबानॅ ती जवाबदारी घॅथ्लोती. क नाय घॅदॅ. बरा ईर्शीला शर्टपीस-पॅंटपीस. भारीत्सॉ भारी खाजूर, बदामॅ आन भारी भारी शाकलेट, अत्तरायो बाठ्ल्यो, दर ट्रीपला शाब्यो त्यादो न सूकता आढ्यासॉ. आन या टायमाला तॅ त्यादो शाब्यानॅ बॉठ्ठॉ कस्नॉ, सूनी गा कपास-पेंड (सॉनी) का हांगात्यात त्याऑ टीवी आढ्लॉतॉ.
आशार खाला गा लाशार हव्यास लागातॅ. थॉडक्यात का ? तॅ शाब्याई लग्नाई तयारी फूल जाल्ती. त्याला धास्ती करॅसा कय काम नॉता. आलॉ गा, भंडारी हांगात्यात तंहा "पाटावर नूस्ता बोहासां बसं".

शीटी पडूल्यापासून तॅ, तळनॅ काड्यादो, हांज्या-लाग्ल्या पासून तॅ ऊंबराऑ पानी हाड्यापोत, मांडवा दीहा हाडी-सॉळी घॅऑन जानाऱ्यापासून तॅ आयेज नॅनाऱ्यापोत, लग्ना दीहा पासून तॅ सवदीहा पोत, बरी सात-आठशे "दिनार"शी दारू यॅनॅ वाटीली. (१ दिनार= २३० तॅ २३५ ₹). आतॅ "दिनार" ऑड्या करतान बोयलॉ कारन याला कर्तॅ पन वीसारला तॅ या ऊत्तर एकूस. 'ऑडॅ दिनार' अडे खप्लॅ तॉडॅ "दिनार" तडे खप्लॅ. साळॅ दॅतॉतॉ "ईंडीयन" रुपय पन "दिनार" सॉ माज दावड्यासॉ. आपल्यातॅ बी का करॅ? बिना खूराबाए, पानॉ देतॅ ना! मंग गपशूप दुव्याशी आन ऊठताना बी वरती तीया पाठीत थॅपॉ मारॉन ऊठ्यासा. भाखडी जाली गा पाग हॉडॉन हॅपाटॉन द्याशी. पैश्याऑ, सॉरीsss "दिनार" सॉ हूकाळ ऑथॉ, तॅ लग्ना मीनॅ खर्स पन तॉहॉस कॅलतॉ. बरॅ शार दीहार्शे बाजॅ कॅल्तॅ. हॉकऱ्यानॅ ऊंबराऑ पानी पन बाज्याऑस हाड्लॉ. बापाला पन त्या पैशाऑ माज, हांगातॅ 'सकाळ्या तळयासॉ पानी ऊपॅदॅ, पन मा शाब्याए "दिनार" नाय खप्याशॅ.' बय हूक्की हूतेरी. पन आंगोरश्या त्या दूबयश्या हॉन्या डागीन्याबळॅ तीआ वजान जेमतेम शाळीस-एक कीलॉ भरदॅ.

लग्नादिहा फटांग्ड्याई माळ ऑडी बोठ्ठी लाईल्ती की दॅवळा मिसाऑ शेवटसॉ गानॉ खप्लॉ. बॅंडवाळया एक संगीत वाजवॉन जाला, तरी फटांग्ड्याई माळ खप्यासा नाव नॉता. पास-स संगीत वाजवॉन जालॅ देवळोर. फूटु-शूटींग पन जाला. वीडीयो-ग्राफी पन जाली.

(अयली पयली विडीयो शूटींग त्यानॅ गावात हाड्ली. पन त्या वीडीयो शूटींग आन त्याए "दिनार"नॅस लग्नात घोळ घालॅ, ता या दूबयशा शेखला कडॅ मईत.) पन नावळ नींग्यासा नाव नाय. कूनॅ तरी तॅला जाऑन कानात हांगीला.

“लवकर सल, जीवनॅ ऊठव्याशे पन आथ. तू अडॅस देवळोर उहूर जॅ करदा तॅ कंहा का हव्यासा?”. शाब्याऑ प्रॉब्लेम वॅगळॉस ऑथॉ. नावळी पूडॅ नासनारॅ गावात्शॅ तरून पॅार तॅला कय नंद्र्या पडात नॅातॅ आन नीखळीस न नास्ता-उड्ता नावळ न्याशी तर कंही? हॅबदाड-बॅबदाडाई नावळ थोडीस ओथी ‘ती’? बॉलॉन सालॉन "दिनार"वाळया शाब्याई नावळ ती. देवळा नींग्याशा पुड्नॅस यॅनॅ काळोखाअॅ पासूपा दा-एक "दिनार" दॅऑन ठोईल्तॅ. देऊळशॅ येताना नावळी पूडॅ पोरे नास्ले पात बघून. पासू आन कंपनीला नीव्यापोत धीर कडॅ हॉथॉ. बकरी मऱ्याशा पूडनॅस त्याई कॉथळॉ काड्लॉतॉ. हॉकऱ्याई तॅला देवळापोत होड्ला आन तड्नॅस बस पकडॅान हॉपाऱ्या नींगालॅ बार मीनॅ. मांदरीआ ऊंह्या खाऱ्याऑ कूडकॉ... मंग मांदरीई नीज कदो लागातॅ.. शेब्याई हालत, हॉला गॅला पान्याला आन पारवा बॅहला बगीत वाट. अंहीस जाली. शेवटी ना सल्त्याला तॅनॅ बारके दा-एक पॅाराटॅ कंटाळलोते ते, आन शार-पास बायको आन पोऱ्यो रेल्त्यो त्यो हरी घॅथ्ल्यो आन बॅंड मास्तरला "मार्च-पास्ट" शी खून केली. वराडी मंडळीपेक्षा बाज्यावाळॅस नावळी पूडॅ घनॅ दीखातॉतॅ. नावळ नींगाली बाबा देवळोर नॅ.

दॅवळा गेटपा नावळ येतॅ बास तव "पासू" अॅंड कंपनी रीक्षात्नॅ ऊतारली. पासूऑ पयलॉस प्रश्न. का रॅ "शाब्या" कॉडा वखत देवळोर काड्यासॉ रॅ? लवकर नींगॉ सला! तॉ बॉलतॉ हाय तव "पास्कोल" नावळी पूडॅ गॅलॉ. नवरा-नवरी पूडॅ ऊबी रॅऑन त्याना सलॉनूस दे नाय आन वरसा घॅथ्ला... "आज पासूनsss खप्ला रॅ शॅब्या तूझाsss अठवर पsssन" आन नावळ पूडॅ जाऑन देस नाय. शाब्याव महाबा वैताकलॅला ऑथास... तॅनॅ त्यास रागायॅ "पास्कोल"सा गप्साट पकडला आन दीला नावळीया बार ढख्लॉन. ‘साळॅ! मूत प्या गॅल्तॅ त्या पायेन नावळ लेट केली. आन अजून बी लेट कऱ्या लावीलॅ.’

पास्कोलसा गप्साट पकडता खोटी, सायमन शेब्याआ महाबाशा आंगोर गॅलॉ. तराड जाल्तॅ सगळॅ, तॅ बॉल्यासा कूनाला. मायकलसॉ पाय जाग्योर पडात पन नॅातॉ. तॅनॅ पन तडनॅ महाबाशा टायलास हाथ घायलॉ. टाय कय तॅआ आथात आली नाय, पन तॉस महाबाश्या आंगोर पड्या गॅला. पन सायमननॅ वॅग्यात पकड्लॉ. तीगू सोगू महाबाश्या आंगाला झूंबलॅ. शेवटी शाब्यास मीनॅ पडलॉ. हॉडवा होडव जाली. पन एक "तह" जालॉ. लीडर पासू हांगातॅ, ‘शाब्या आमी तूऑ मान ठोईत्याव, पन ऑ तूऑ महाबा हाय, तॅला हांग अडनॅ तॅ हांशी नावळ सड्यापोत आमशा मॅरॅ यासा नाय आन आलॉ तॅ बीना टीकीट तॅआ घारा नवाळॅत पार्सल धाडलास मनून समाज. (पाय अॅकाऑ पन जाग्योर  पडात नॅातॉ मंग बी पार्सल कूनॅ बांद्यासा. पन, कूत्ता अपनी गली का शेर।)

थॅाबा-थोबी जाली. "तह" पन जालॉ. नावळ वाट्याआ लाग्ली. नावळ सल्ती हाय तव मॅरनॅ एस्टी बस आली. पास्कोल परत कडनॅ आलॉ आन तॅआ बसवाळ्या पूडॅ ऊबी रॅलॉ. एsss बस होपsss होप. होप मींजॅ होप! बसवाळयानॅ बस ऊबी केली. डायवर भूयगाव सॉ पीटर. तॅला पॉराई साल मईतूस ऑथी. पॉराई बस कूट कूट कूटीली. बस सालू जाली परत, तरी पास्कोल सा मन कय भरात नॉता. आंगात हाय ती थोडीस शांत बॅहॉन देतॅ? पास्कोलनॅ सलत्या बसवर परत कूट्या लावीला. बससा पत्रा थॅाडा फाटॉन बार आल्ता तॅहॅ तॅआ आथाला ऑरखाडॉ आलॉ. जूरूखसा रगातपन आला. पन बस थांबवॉन कूटीली त्या पराक्रमा पुडॅ ता रगात कीस झाड की पत्ती. नावळ एकदाशी मांडवात पोस्ली बाबा. जक्ले पावनॅ नावळी वाट बगीतोते. जीवना तयारीपासून तॅ दारूआ काऊंटरपोत सब्बान तयारी "जय्यत." फक्त केक काप्याशी खोटी.

डाम्नीक मास्तर पयलॉस आथा माईक घॅऑन टेजवर "हॅलो हॅलो माईक टेस्टींग  १..२..३.. हॅलो हॅलो करीत नावळीई वाट बगीतॅाता. नवरा-नवरी स्टेजवर सडले तव पोत साडेबारा वाजलॅ आन डॉमनीकनॅ सूरवात केली. ‘शेब्या वक्ता शेब्याई बय पास मईन्याई पूर्मुशी (प्रेग्नेन्ट) ओथी तॅतपासून, तॅ शेब्यो हल नींगूत टेजवर सड्लॉ तवपोत. सब्बान आळू बॉंड घाठॉन जाला, तॅनॅ बरे वीस एक मीन्टे घाल्वीले त्यात. लॉकाना वाट्ला आतॅ केक कापॅ. पन मास्तरशा आथा माईक आलॅ तॅ मास्तर आयकातॅ! आंदळया नंद्र्या सांद पड्लॅ. मास्तरनॅ शेब्या वाड्गोदो (बॉठ्ठॉ बाबा) लजार भेठ्वीला. मंग ठॅात्याई डोकरी, मामरसॉ डॉकरॉ,  मामरशी डोकरी, नवरीआ डॉकरॉ-डोक्री, मामरशे ओथेनोते तोडे जक्ले सरगातनॅ टेजवर आढ्ले. अरे पन परसंग कूहनॉ हाय? टाईम कॉडा जालॅ? पावनॅ खोटी आथ. ता, या लॉकांन्ना कय कळॅस नायदॅआ ऑ प्रश्न माला पड्लॅ. वॅड्याआ आथा कोलूत... तॅ वॅडॉ नींगालॉ गाव पेट्वीत. शॅवटाला पासू आन कंपनी कॉपऱ्यात ऊबी ओथी, त्याई पापोळयो माऱ्यादो सूरवात केली, तॅ झेट थांब्या तयारूस नात, शेवटी मास्तर समजालॉ, आवारता घॅथ्ला.

"आता मी वधु-वरांना विनंती करतो की त्यांनी केक कापून..." तीगाळा कडॅ कॉपऱ्यातनॅ टाळयो वाज्याश्यो बंद जाल्यो.

केक काप्लॉ. बार ओपन. जीवनॅ सालू जाले. वीडीयो शूटींग आन फूटू टेजवर सडनाऱ्या परतेक माहनाऑ शाब्यानॅ घॅठ्लॉ. तॅत तॅआ जाम टाईम खोटी जाला. तीन वाजलॅ तवपोत काऊंटर सालू ऑथा. जीवनॅ ऊठता ऊठता साडे शार वाज्लॅ. तॅत बी शाब्याय वसयशॅ खास मीत्र (दूबय रीटन) बॅहॅल्तॅ. तॅ हांशॅ पास वाजलॅ तरी दारू प्याशॅ थांबलॅ नात. जीव्यासॉ तॅ पत्तॉस नाय. (VIP ट्रीटमेंट त्यांदो ओथी) शाब्या घडीबर त्यांहरी बॅहलॉ. दोन एक ढखल्लॅ. मंग त्याना हांगातॅ, माला सात वास्ता नावळ हाड्या जासा हाय. तूमी एन्जॉय करा. मॅ आंग धऑन जरा फ्रेश हवातॅ. सात वास्ता नवरॉ नींगालॉ नावळ हाड्या. जाताना तीन शार 'बाठ्ल्याओ' तॅनॅ बेसमनला हांगॉन बंदोबस्त कॅलॉ. हारोडीशी मंडळी नवऱ्याखीरी वीडीयो शूटींग वाळयालास बग्यादो ऊल्टाल्ती. खऱ्या हीस्पाला आपल्या मीनॅ नावळ हाड्या गेले गा नवरी घरशॅ नासात नात. लेक डॅव्याशी तॅ जकल्यान्ना दूख हवातॅ. पन अडे "पीक्चर" कय वायलास ऑथा. वीडीयो शूटींग सल्ले, तॅ गावशा वेई मंडळीनॅस बगीतॅ तव मांडव अल्लामत आरंगील्तॉ. तॅत नवरीई मावशी तॅ तीया भाआपोत जक्लेस नाशा घूस्लोते. मांडवात वग कमी पड्लॉ तॅ बी ऑट्योर पन खयताळॉ. या गडबडीत नवरीई तयारी करेसा कूनाला धॅन्सातूस रॅला नाय.

अडनॅ बगीतॅ तव पासू अँड कंपनी आली. "घूमराट" दॉपारसा हॉतास आंगात. तॅत बी बेसमननॅ पासूला बोलवीला आन जॅआ पॉरापा "बाठ्ल्यो" दील्त्यो तॅऑ पत्तॉ दीलॉ. पास मीनटात मंडळी "रिचार्ज ऑहॉन मांडवात "अतीक्रमन", मांडवात घूस्ता खूटी तूमाला का हांगॉ धख्खा मूक्की आन नास्ता-नास्ता खालनॅ लाती सूरू जाल्यो. वॅई मंडळी मांडवात्नॅ कटनॅ गूल जाली ता कळलास नाय. पास्कोल नास्ता नास्ता, हाकोबटश्या बसशा स्टाईल मीनॅ (बॅंड) मास्तरशा पूर्डे आलॉ. मास्तरsss थांबाsss थांबाsss मास्तरनॅ कलानी हत्तीया हॉंडी (सोंड) घथीन वरती केली. आन. टॅं अँ अँअँअँsss रीक...? बाजे थांबलॅ. मास्तर.. माआ ई गाना घ्या...! (श्यान्या सतूरा शा रे पूतरा या गीता सालीवर) गाडकूलीsss! गाडकूलीsss ! गाडकूsssली! नवरीशा बाबाशी आंडकूलीsss! वाजवा !!!. वाजवा मास्तर!!!. आतॅ ई कय गीत जाला गा? पन बॉलनार कुनाला. अॅकामॅका व्यायांशी टर खॅश्याशी रीतूस आपल्या लग्नात हाय ती. बारके पाराटे तरी कय कमी दीहाशे हाथ आ रॅ शाब्या गावशे ?

हॉकऱ्याई मॅरशा फूलशेरी काकाआ गॉठ्यात दोन अॅटम-बॉम (हुतळी-बॉंब) फोड्लॅ. तॅए ढोरे जक्ले भूर्खाले. तांब्या बैलानॅ तॅ नाथ तॉडॉन जॉ जॉट्टॅ हूटलॉ मॉकळॉ, तॉ ऊबी रॅदो हींवरात्शा राटोर. काकानॅ दोगी तीगी पोरे टूकान कानोर आहड्योते. पन वीसार कॅलॉ लग्नात खयताळॉ नाका. पावनॅ-आठ वाजात आलॅ. शाब्या घडॅळोर बगीतॅ आन मास्तर वर बगीतॅ. नवरीई तयारी जाली बाबा एकदाशी. आतॅ खेमो घ्याशो आन नींग्यासा. पन यायो खेमो कय खपात नात. वीडीयो शूटींग हाय तॅ जक्ल्योस बायको खेमो घ्या लागल्यात. आठदीस पूडनॅ मरी काकय आन व्याईनीनॅ एकी-मेकींयो हेंड्यो ऊस्कील्त्यो, ती मरी काकय पन बगीतॅ तव खॅम घ्याशा लाईनीत ऊबी रेले. दापूडश्या बाल्या काकाआ डोकरीऑ, एक पाय खाशा कड्योर हाय. बगीतॅ तंव ती नात्नीऑ आथ धरॉन डेवनीयोर नॅ सड्या लाग्ले खॅम घ्यादो. बायल्या फराशीं बगीतॅ, तव, तॉ पन खप-खपॅ रडॉन खॅम घ्या लाग्लॅ.

पासूनॅ अंदाज घॅथ्ला. वीडीयो शूटींगवाळया कानात जावॉन कयतरी हांगीला. कॅमॅरॉ मांडवात फीरलॉ आन फोकस बंद जालॉ. तह्यो खेमो बंद जाल्यो. पासूई नक्कल कामाला आली. बाज्यावाळयाई "बाबूल की दूवाए लेती जा" गीत घॅथ्ला आन मांडवातनॅ नावळ एकदाशी नींगाली.

पासूवा गाडा हारका-हारका जक्लॉता. तॉरनाऑ बांबू ऊस्क्या गॅला तॅ तॅऑ तडॅ "कडेलोटूस" जालॉ. जेमतेम तॅनॅ तॉ बांबू ऊस्कीलॉ. तॉरन काड्ला आन हत्रीयोर लाव्या लाग्लॉ तॅ, नवरीया वॅंग्यातूस पड्लॉ. बॅज्या पॉरानॅ तॅ कमालूस केली. ती कडसॉ पाईप वेल्डींग करॉन बॉम पॅटव्यादो बंदुक केल्ती. तॅतनॅ तॅनॅ बरॅ दा-एक बॉम ईश्टाईल मारॉन पॅटवीलॅ. आतॅ पूडश्या बॉमला तॅनॅ वेगळीस स्टाईल मारली. बॉम पेटवीलॉ आन एक तंगडा तूकॉन कडी खालनॅ हाथ घायलॉ. बॉम फूट्लॉ,,, ठ्ठोsss! बॉम सरळ, मन्या काकाआ पॅंड्या ऊडव्या मीनॅ. जकल्याई धावपळ. वॅई मंडळीत्शा कूनॅतरी "प्रसंगावधान" दावड्ला आन त्यो दोन तीन पेट्लेल्यॉ पावळयो ऊडव्यात्नॅ खसकन खेशील्यो, त्योर पाय मारॉन विज्वील्यो, अनर्थ टळलॉ. नाय तॅ ऊडव्याऑ तडेस राब पेटॅसॉ. नावळ पूर्डे सलती हाय. हरान मयन्यात जही पान्याई हर-हाट मिनॅ-मिनॅ येती आहातॅ तहा "शाऊन" "बाठ्ली" नावळीत मीनॅ-मीनॅ फीरातोता.

नावळीया मॅरनॅ बगीतॅ तव शंभू पाववाळा सायकल आथामीनॅ घॅऑन ट्रिंग-ट्रींग करीत रस्तॉ काडीत साल्ला. बेम्ट्याआ पॉराआ आंगात कळ कमी, तॅ हॉकरॅनॅ तॅई सायकलुस मांगनॅ धरली. भोजपूरी मींसा, भॉसx पन बॉलता येत नॉता आन तरी झुंम्बलॉ तॅला, "एsssss फलनवा, कैसन हो, ईंहा आवा हो, नाही धोई ककडी खाई का, एsss बूx च्योx रूका हो तनीक" भय्या बीशारा का बॉल्यासा, हांगातॅ. "ए बबूवा खाली फोकट गालीया काहे बकत हो हमका? हम कौनो तकलीफ दीये है का तॉहके ? हमका जाये दो, हमका देर होगईल बा" बेमट्याऑ 'लल्लक' ऑलॉ बुंबूल जालॅ तॉ आयकातॅ कदो. "ई लैलॉ, ईक ठो पैगवा मार लॉ हो" हांगॉन तॅपा

शाऊन दीला. ता कय प्यादो तयार नॉता.. "बबूवा हमार धंदा का टाईम है, हमरे साथे ऐसन मजाकवा ना करो हा, तुहार बाबूजीके ऊमर के है हम". ता नाय करतॅ, तंव यॉ हांगातॅ "हमरे शेब्याभाई का शादी है, तूमका पीयेके पडी" आन यॅनॅ बाज्यावाळॅ नाय गा थांबवीलॅ.

मास्तरला हांगातॅ. ‘‘मास्तर ! थांबा थांबा, मा  एक हिंदी गाना वाजवा, खाना मीलेंगाssss पीना मीलेंगा शाब्याकी शादीमॅ दारू मीलेंगा, वाजवा ई माआ गीत. कलमेत मीनॅ पड्लॉ, आन हांगातॅ ता कईस नाय मास्तर.....!

"नाशीक ढोल" वाजवा. नाशीक मींजॅ नाशीक ढोलूस. वाजवा ...वाजवा...

ढाम...!ढाम...!ढाम....! टांन....!टांन....!टांन....! ढमा कडा...! ढमा कडा...! ढमा कडा...!

नाशीक ढोल सालू जालॉ. नाशीक ढोल सालू अव्हता खूटी, एखूंद मस्ताड भय हडाला आथ लावीलॉ गा ऊडातॅ कही, तंहॅ जक्लॅ बीड्डा भूजीतानाशा वाला हारकॅ खापरीत ऊड्या लाग्लॅ. दा-एक ऊड्यो मारल्यो, आन पासूआ पॅाटात मळमळ्या लागला. कॉपऱ्यात गटारा मॅरॅ जावॉन तॅनॅ दोनी आथ डॉख्याला धरलॅ, आन बतकन  खाला बॅहलॉ. पास्कोल जूरूख वॅळान तॅआ मॅरॅ गॅलॉ. तॅला हांगातॅ, ‘का रॅ पासू ! ता डॉकऱ्या माहना गथीन खाला बॅहॉन का मूताता..!

तॅनॅ पासूआ पूडॅ बगीला तॅ, बापरे..! अस्नी बोठ्ठी रांगोळी. तॉ तॅआ पाठीत दडप्या लाग्लॉ. अॅका पॉरा दरनॅ पानी आपवॉन पासूला ताँड धव्या लाईला. सव्वा नव वाजात आल्तॅ. "दिनार"वाळ्या शाब्याई नावळ बाबा नासात ऊडात एकदाशी मांडवा दारापा पोस्ली....

## जबाबदारी -- फ्रॅंक डॉ. मिरांडा, उमराळे

प्रियंका, बय-बाबाई एकुलती एक पोरी. ती पप्पा शिक्षक, लवकरुस रिटायर हॉनार ऑथॉ, आन मम्मी घारास. प्रियंका लग्नाला फक्त कय मयनॅ शिल्लक ऑथॅ. बय-बाबाला प्रियंका लगीन थाटात करॅसा ऑथा, पन प्रियंकाऑ मात्र त्यांना तीव्र विरोध ऑथॉ. तीआ मत आहा ऑथा गा, मागशे शार वहरे नोकरी करॉन मॅ जॉ पैसॉ जमविलॅ आन माऑ जॉ पगार हाय, तॉड्यात बॅहॅदॅ तॅआ पद्धतीनॅ मॅ मा लगीन करनार, तुमी मा लग्ना एक पैसॉ पन खर्स करॅसॉ नाय; आजपोत माकरता तुमी जा का कॅलॅ ता पुरा हाय. माला बारक्याआ बॉठा कॅला, अडसनीत-आजारपनात हांबाळला, बरा शिक्षान दिला, मंग ॲका पोरीनॅ तिआ आय-बाबादरनॅ अजून बी का अपेक्षा ठॅऑशो? लगीन फक्त एक संस्कार गा सॉहळॉ नहॅान, ती एक जबाबदारी हाय. एका बॉठ्या जबाबदारीऑ आपू मिसामिनॅ फादरशा आन ऑबड्या लॉकांपुडॅ वचन दॅऑन स्वीकार करत्याव, मंग त्याई सुरुवात मॅ लग्नापासून करनार. कय वहरान पप्पा रिटायर जालॉ गा घरात मयन्याला पैसॉ यासॉ बन हॉयदॅ, मंग दरपाळी मावर  बगन्यापेक्षा तुमी मा लग्नाला जॉ पैसॉ खर्स करनार हा, तॉ तुमशा पुडशा जीवनाकरता वापरा.

आज आपु जर आपल्या मॅरॅदॅरॅ बगीला तॅ एक गोष्ट धॅनात येतॅ गा, आयुष्यभर मेहनत करॉन जमलॅलॉ पैसॉ आय-बाप पॉरापोरीआ लगीन आन घराकरता खर्स करत्यात;  सॉता पुडशा आयूश्याकरता एक दमडीपन ठोईत नाय. सगळ्योस गोष्टी बयबाबाइ दिल्यानॅ पॉरांन्ना जबाबदारीई जानीव रॅ नाय. घर बांद्याकरता गा लगीन करॅकरता कॉडॉ पैसॉ लागातॅ, तॉ पैसॉ कोडे वहरे मेहनत करॉन जमव्या लागातॅ गा कर्ज काडॉन ता भऱ्याकरता का सटकॅ सहन कऱ्या लागात्यात याई त्यांना कल्पना नाहतॅ. लग्नाव खर्स बय-बाबा टुकित्यात भगून आज अगदी तरुन वयात आन मानसिक परिपक्वता याशाअगोदरूस बरेस पोरे लगीन करॉन हुट्टे पडात्यात; मंग लग्नानंतर आयुष्यात कय अडचनी आल्यो गा येस पोरे धीर होडतॅत आन हार मानत्यात. आज लग्नाला  ‘संस्कार’ भगून पाय तॉडा महत्व दिला जाय नाय; जीवनाव एक भाग भगून त्योर बगीला जातॅ. आयुष्यभराई कमाई बय-बाबा आपल्या पॉरान्ना देत्यात आन भविष्यात पॉराहरी-ऑबायशा हरी कय बिगाडला गा मंग बय-बाबादरी पैसॉ तॅ नाहतॅस आन नहातॅ कुहनॉ मार्ग. तॅतॅन, पालकांई ई नैतिक जबाबदारी हाय गा आपु आपल्या पॉरांकरता कुहन्यो गोष्टी कऱ्याशो आन कुहन्यो गोष्टी तॅना कऱ्या हांग्याशो. त्यांना चांगला शिक्षान दॅऑन घराकरता थोडीथोडकी पैशाई मदत करॅसा तुमसा काम तुमी पार पाडा, पन त्याबरबर प्रियंकाप्रमाणॅ तॅनापन सोतोर काईक जबाबदाऱ्यॉ घेऊनदे; आज मुंबयला ओबड्या पगारायो नोकऱ्यॉ आथ, भगून तॅना नोकरी करॉन, बचत करॉन सॉता लगीन करूदे, डोख्योर नाखोडा कर्ज दॅऑन घर बांदना कॉडा कठीन काम हाय याई तॅना जानीव करॉन द्या. आंगोर जबाबदाऱ्यॉ हायद्यात तॅ पुडशी पिढी शिस्तबद्ध आयुष्य जगू शकनार, नातॅ यॅनारी पिढी ई बेजबाबदार हॉयदॅ.

## मामरशी दादी -- सिल्विया एरिक रॉड्रिग्ज, उमराळे

कुनाकरता ती मामरशी बय, कुनाकरता बलो, तॅ कुनाकरता बाय. आजकाल मम्माशी मम्मा, नायतॅ मामरशी मम्मा, पन आमशाकरता ती लाडकी, मामरशी दादी. लाल लुगडा, काना वाळयो, खांदयोर तॉ नॅहमीसॉ पांडॉ हुडकॉ, तीआ गळयात नायतॅ आथात कायमशी रुजार, कमरपट्याला लावलेली ती बटवी अही ई मामरशी सादी-भोळी दादी. खूब प्रेमळ, पैशानॅ आन मनानॅ उदार, तहीस हुशार जही वकिल ती. दादीशे आमी जकले मिळॉन ११ नातोंडे, ५ नातन्यो आन ६ नातू अही ११ जनाई क्रिकेटशी टीम, जकले तीकरता हारकेस, जनू ॲका माळीॲ मनी, ॲकाला घना आन दुहऱ्याला कमी आहा तीनॅ कत्तॅस कॅला नाय. आमशोर तीनॅ हारका प्रेम कॅला, मया पन हारकीस, आन तीआ शीडनापन जकल्यांकरता हारकास. शाळीला रजा पडली गा, नायतॅ हिनवार आलॉ गा, आमाला उतळी पड्याशी मामारा जाशी. मंग आमी मम्मीई पाठ कार्डॉन तिला मामारा न्या हांग्याशे. मम्मी आमाला भिगावशा रिक्षात भॅव्याशी, तॅआ रिक्षावाळयाला १ रुपय दॅऑन तॅला नाक्योर हॉड्या हांग्याशी. रिक्षात कुन ना कुन ओळखीआ भॅट्यासास, मंग ते आमाला मामारा हॉड्याशे. दादीतॅ ११ नातोंडे, पन मामारा गेले गा आमशॅ जरा घनॅस लाड हॉॲशॅ; कारन बी जकले ती मॅरॅदारॅस अह्याशे.

मामरशी दादी मंजॅ सुगरन. ती आथाला सवुस कय वायलॉ. ती एक-एक पकवान बनवॅशी तॅला कय वायलॉस सव. ती आथशा डाळीला जणू मटनाव सव. दादी लाड करॅशीस, पन हरी शिस्तपन लाव्याशी. तीला उलटा बोयलॅला आवड्यासा नाय. दादी पुर्डॅ आमी कतॅ उलटा बोयल्यात हायदॅ आहा माला आठवॅ नाय. तेस करताना तिला मस्ती केलेली अजिबात सल्याशी नाय. प्राथना एकदम शांत आनी मनापासून करॅशी आहा तीआ मत. देवोर तीऑ जाम विश्वास ऑथॉ. ती सॉता तॅ प्राथना करॅशीस, पन हरी आमाला पन करॅआ हांग्याशी. रॉजसा मिस तीनॅ कतॅ सूकविला नाय. रजे दिहा कतॅ खॅळताना आमाला दादी दिखली गा आमी पळात-पळात तीआ दरी जाशे आन ती आथशी पिवशी घ्याशे; आमाला आशा पन अह्याशी गा दादीनॅ आमादो कय खादो हाडलॅ हायदॅ.

मामरशा दादीई मया कय वेगळीस. ती पैशन श्रीमंत नहली तरी मनान मात्र शेट ओथी. ती दरी जा का हायदॅ तॅतनॅ ती दुहऱ्याला मदत करॅशी. तीनॅ बटवीमिन्नॅ रुपय कार्डॉन दिलॉ गा आमी जाम खुश हॉॲशे. तीआ बॉलना कडाक ऑथा, पन तॅतनॅ तीनॅ कुनाला दुखविला नाय. ती भाषा सरळ आन स्पष्ट. ती नॅहमी खऱ्यायी बाजू घ्याशी, खॉटा बॉलना तीला आवड्यासा नाय.
अही जकल्यावर भरभरॉन प्रेम करनारी, आमाला शिस्त लावनारी आमशी मामरशी दादी कुहनास आजारपन नसताना अचानक दॅवाला प्रिय जाली; सुखाआ मरान आला तिला. विसार आन कर्तृत्वान चांगली आमशी मामरशी दादी नक्कीस दॅवा मॅरॅ हायदॅ. तिला स्वर्गीय नंदनवनात स्वर्गीय सुख लाभो ईस आमशा जकल्या नातोंडाई इच्छा.

---

## फा. फ्रान्सिस दिब्रिटो

गाव – **जेलाडी**   पॅरिश – **नंदाखाल**   जन्म – **०४ डिसेंबर १९४३**

दादय – **सांतान दिब्रित**   बाबा – **लोऱ्या दिब्रित**   **२१ जून १९६२** – सेमेनरी प्रवेश

**२३ डिसेंबर १९७२** – फादरशी ओडदी   **पयली नेमनूक** – पाली चर्च, नायगाव

पुना, गोरेगाव सेमिनरी, रोम, मूळगाव, गिरीज, सांडोर, शिरलयवाडी, सुवार्ता कार्यालय, जीवन दर्शन केंद्र या ठिकानी प्रेषितीय कार्य.

**ऑक्टोबर १९८३ तॅ जून २००७ – २४ वहरे सुवार्ता मासिकाव संपादक.**

आतेपोत सोताये १४ पुस्तके आन ४ अनुवादीत पुस्तके अहे १६ पुस्तके प्रकाशित जाल्यात

आतेपोत पुस्तकांना, समाजसेवेकरता, पत्रकारितेकरता एकुन ३३ पुरस्कार मिळाल्यात

---


हार्दिक शुभेच्छा

कल्पतरू ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, भुईगाव

# जीवन विकास नागरी सहकारी पतपेढी (मर्यादित) वाघोली

रजि. न. टीएनए/ व्हीएस् आय/ आर एस् आर /सीआर /४२९/८८-८९ दि. ९-१२-८९ दि. ९.१२.१९८८

# कोकण विभागातील अग्रेसर पतपेढी

आपल्या व्यावसायीक व कौटुबिक विकास योजनेसाठी पतपेढी सेवा

१२ महिन्यापेक्षा जास्त ते १८ महिन्यापर्यंत

ज्येष्ठ नरगरीकांच्या ठेवीवर - द. सा द. शे. ७.६५% व्याजदर

सर्वसाधारण सभासदांस द. सा द. शे. ७.४० % व्याजदर
८.७५% ते १२: व्याजदर विविध सुलभ कर्ज योजना
द.सा.द.शे ७.७५ सरळव्याज

घरबांधणी/ फ्लॅट खरेदी द. सा द. शे. ९.२५ % व्याजदर

शॉप, गाळे, मशिनरी खरेदी द. सा द. शे. १०.५० % व्याजदर

रू ५ लक्ष पतकर्जाचे त्वरीत वितरण द. सा द. शे. १२ % व्याजदर

नियमित कर्ज भरणा करणाऱ्यांना व्याजात २% रिबेट
३० सप्टेंबर २०१९ अखेर आर्थिक प्रगतीचे बोलके आकडे

| | |
|---|---|
| भागभांडवल रू ११.३८ कोटी | कर्जे रू १०८.५९ कोटी |
| ठेवी रू २५४.३३ कोटी | गुंतवणूक रू १९३.९३ कोटी |
| एकूण व्यवसाय ३६३ कोटी | सभासद संख्या १४५२६ |

ढोबळ एन.पी.ए. १.४१ %

## दि. ३१.०३.२०१९ अखेर नफा रू ६.७१ कोटी

| निर्मळ | सत्पाळा | उमराळे | नानभाट | आगाशी | नालासोपारा पं. |
|---|---|---|---|---|---|
| ८६०५६९४२५५ | ७२६१९१९०१२ | ०८५५०९१०२६४ | ७२६१९१९०१३ | ०८५५०९१०६४३ | ७८७५५८९५५०८ |

लता फोस
मुख्य कार्यकारी अधिकारी

मॅथ्यू डिसोजा
उपाध्यक्ष

सिल्वेस्टर ए. दोडती
अध्यक्ष

व संचालक मंडळ

BASSEIN CATHOLIC
CO-OPERATIVE BANK LTD

ESTD. 1918

(SCHEDULED BANK)




Corporate Office: Catholic Bank Building, Papdy Naka, P.O. Papdy, Vasai - 401 207
Contact No.: 0250-2322053/0250-2322449 I Toll-free: 1800 233 6000 | www.bccb.co.in